PENNA CEMENT
पेन्ना सिमेंट
आधार • ताकद • टिकाऊपणा
MUMBAI: 88888 79235



SUNDAY
# लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू



SPECTRUM ACADEMY
...Coaching For Competitive Exams...
100% RESULT ORIENTED COACHING
MORE THAN 1000 SELECTIONS
Admissions Open for
Foundation Course, Regular Batches, Weekend Batches
Bank Recruitment
Probationary Officer & Clerical Exams
UPSC / MPSC
Prelim + Mains
पोलीस भरतीचे मार्गदर्शन वर्ग
Staff Selection
Railway Recruitment Exams
Thane Branch : 2nd Floor, Thakur Building, Above Tip-Top Building, Near Railway Station, Thane (W)
SPECTRUM ACADEMY मो : 8308908884/85



www.facebook.com/lokmat
मुंबई, रविवार, दि. २६ ऑगस्ट २०१२ • पृष्ठे: १२+४+८ = २४, किंमत: ₹ 3.00
epaper.lokmat.com | www.lokmat.com


# कॉपीकॅट सॅमसंगला ॲपलचा दणका!

## डिझाइन चोरी केल्याचा ठपका, १ अब्ज अमेरिकी डॉलरची भरपाई द्यावी लागणार

**वॉशिंग्टन** | दि. २५ (वृत्तसंस्था)

**तंत्रज्ञानाची** संकल्पना, डिझाइन यांची सॅमसंगने कॉपी केल्याचा ॲपल कंपनीचा दावा सॅन होजे येथील न्यायालयाच्या ९ सदस्यीय ज्युरीने मंजूर करीत १ अब्ज अमेरिकी डॉलरची (सुमारे साडेपाच हजार कोटी रु.) भरपाई देण्याचा आदेश सॅमसंगला दिला आहे. त्यामुळे कॉर्पोरेट क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

तंत्रज्ञानाला नवा आयाम देणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांनी आयपॉडनंतर आयफोन आणि आयपॅड यांच्या माध्यमातून कॉम्प्युटर, स्मार्टफोन यांची परिभाषाच बदलून टाकली. स्वाभाविकपणे ॲपलची उत्पादने स्टेटस सिम्बॉल झाली. याचा थेट परिणाम मुख्य स्पर्धक कंपनी असलेल्या सॅमसंगवर झाला आणि त्यांनी ॲपलच्या तंत्रज्ञान-डिझाइनची कॉपी केली.



| ॲपलचे गॅजेट | सॅमसंगची कॉपी |
|---|---|
| आयफोन - २ | नेक्झस एस - २ स्मार्टफोन |
| आयफोन - ४ | गॅलेक्सी एस - ३ एस |
| आयपॅड - १ | गॅलेक्सी टॅबलेट ७ इंच |
| आयपॅड - २ | गॅलेक्सी टॅब १०.१ |

सॅमसंगच्या गॅजेट्सने खुद्द स्टीव्ह जॉब्सही चक्रावून गेले होते. या विरोधात त्यांनी अमेरिकेसह ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, द. कोरिया या चार देशांतील न्यायालयांत दावे दाखल केले. त्यापैकी हा पहिला दावा आज निकालाच्या शेवटच्या टप्प्यात पोहोचला आहे. आपल्या तंत्रज्ञानासाठी घेतलेल्या पेटंटचे उल्लंघन झाल्याचा दावा करीत भरपाईपोटी अडीच अब्ज अमेरिकन डॉलरची मागणी ॲपलने केली. सॅन होजे येथील न्यायालयाच्या ९ सदस्यीय ज्युरी मंडळाने पेटंट कायद्याचे उल्लंघन झाले, असा निष्कर्ष काढत १ अब्ज अमेरिकी डॉलरचा दावा मंजूर केला आहे. आगामी आठवड्यात हे प्रकरण मुख्य न्यायमूर्तींकडे जाईल आणि कदाचित दंडाची ही रक्कम वाढविली जाईल. ॲपलच्या सात पेटंटचा भंग झाला असून, न्यायालयाने वादविवादादरम्यान तब्बल ७०० प्रश्न निकाली काढले.


IIFL
आपल्या सगळ्यात मोठ्या स्वप्नपूर्तीच्या अगदी जवळ पोहोचा!
इन्व्हेस्ट इन युअर ड्रीम्समध्ये भाग घ्या
तपशीलाकरिता भेट द्या www.facebook.com/IIFLGroup


**ॲपल Vs सॅमसंग...**
-वृत्त/१२

बालदिनी पुरस्कार वितरण

## बाबा भांड यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार

**औरंगाबाद** | दि. २५ (लोकमत ब्युरो)



**साहित्य** अकादमीचा बाल साहित्यासाठी दिला जाणारा पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड यांना जाहीर झाला आहे. साहित्य अकादमीच्या बाल साहित्य विभागाच्या केंद्रीय कार्यकारिणी बैठकीत या पुरस्काराची घोषणा करण्यात आली.

१४ नोव्हेंबर - बालदिनी हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, ५० हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र, असे त्याचे स्वरूप आहे. या पुरस्काराचे हे तिसरे वर्ष आहे. यापूर्वी अनिल अवचट आणि दिलीप प्रभावळकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

बाबा भांड हे सर्जनशील लेखक आणि साकेत प्रकाशन संस्थेचे संचालक म्हणून परिचित आहेत. कथा, कादंबरी, प्रवासवर्णन, संपादन आरोग्य या प्रकारातून त्यांनी चौफेर लेखन केले आहे. ते जसे प्रौढांचे लेखक म्हणून ओळखले जातात तसेच मराठी बालसाहित्यात त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. १९७९ला त्यांची 'धर्मा' ही पहिली बालकादंबरी प्रसिद्ध झाली जिच्या आतापर्यंत २५ आवृत्त्या निघाल्या, तसेच दीड लाख प्रती विकल्या गेल्या आहेत. नॅशनल बुक ट्रस्टतर्फे त्यांची ही कादंबरी सर्व भारतीय भाषांमधून अनुवादित होत आहे. 'आनंदमेळा', 'रंग नाही पाण्याला', 'खरी कमाई', 'धर्माची गोष्ट', 'दशक्रिया घाटावरची मुलं', 'बहाद्दर तंट्याची गोष्ट', 'सादाको' अशा त्यांच्या बालकादंबऱ्या प्रसिद्ध आहेत.

↳ महत्त्वाचे

## शंकरराव जगताप यांचे निधन



कोरेगाव - नव्वदच्या दशकात महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय घडामोडींचे साक्षीदार ठरलेले काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा विधानसभेचे माजी अध्यक्ष शंकरराव चिमाजी जगताप (वय ९०) यांचे शनिवारी मुंबई येथील निवासस्थानी निधन झाले. - वृत्त/५

» टोलेबाजी अनिल डांगे


मान्य आहे, त्या प्रकरणात भ्रष्टाचार नाही झाला, पण पुढे तो होण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यांनी राजीनामा द्यावा, अशी आमची मागणी आहे.

# 'अविचल' सुरांचा अविरत 'सोहळा'!

## आशाताईंचे सहस्रचंद्रदर्शन; येताहेत मराठमोळी लावणी घेऊन

**स्वाती देखणे** | दि. २५ (मुंबई)

**सात** सुरांमधल्या प्रत्येक सुराने आपला श्वास घेत जगावं, त्या त्या सुराला त्याचं त्याचं म्हणून एक स्वतंत्र आयुष्य बहाल करावं, त्या सरगमेतला प्रत्येक सूर आपलं स्वतंत्र अस्तित्व घेऊन उगवावा अन् ऐकणाऱ्याला मात्र त्या सरगमेतले सातही सूर एकमेकांच्या प्रेमात गुंफलेले सापडावेत असं गाणं... ते गाणं 'जिवंत', 'अस्सल' आणि 'अविरत'..! प्रत्येक सुराची उंची, त्या सुराचं दुःख, त्या सुराची ताकद, त्या सुराची जाणीव त्याला देत, ते गाणं 'सुरेसूर' असं चिरेबंदी होत श्रोत्यांच्या हृदयाचा ठाव घेतं... ते प्रत्येक श्रोत्याच्या मनाचा, आयुष्याचा आणि जगण्याचा ताबा घेतं... त्या श्रोत्याच्या आयुष्यातला प्रत्येक सुख-दुःखाचा कानाकोपरा त्याच्यात जागवतं..

ते गाणं कुठे राहतं..? कुठे असतं..?

ते गाणं आशा भोसले या नावात गवसतं! या नावापाशी येऊन थांबतं, विसावतं आणि तितक्याच प्रवाहीपणे बरसत राहतं... तितक्याच तारुण्याने..!

या वर्षी त्याच तारुण्याचं सहस्त्रचंद्रदर्शन. आपल्या आयुष्याची सूरमयी ८० वर्षे ज्या गाण्यानं तितक्याच संघर्षाने, सुरेलपणे जगली, त्याच गाण्याचा हा शाब्दिक रियाज..!

त्यांना भेटल्यावर त्याचं गाणं, जगणं आणि जगण्यातली उमेद नुस्ती दिसत नाही, तर आपल्या मनात भावनिक कोलाहल निर्माण करवते. त्यांना पाहून गाण्यात जगणं शिकावं असं वाटत राहतं. त्यांचं हसणं पाहून एखादी निसटलेली सम पुन्हा सापडावी इतकी ताकद मिळते. या सगळ्याच्या पलीकडे त्यांना भेटल्यावर गाणं रसरसून जगल्यावरही सुरांवरचं अवीट प्रेम जाणवत राहतं, अनुभवता येतं...

**प्रदीर्घ मुलाखत**
पान / ६ / ७

ते सारं 'लोकमत'च्या टीमनं अनुभवलं. आशाताईंच्या ८० व्या वाढदिवसाप्रीत्यर्थ 'लोकमत'ने त्यांच्या मुलाखतीची वेळ मागितली. तब्बल अडीच तास ही मुलाखत चालली. या मैफलीत आशाताईंनी त्यांच्या गाण्यातले, आयुष्यातले अनेक टप्पे उलगडले... पण मैफिलीची सम साऱ्यापेक्षा वेगळी होती. या समेवर आशाताईंचं एक वाक्य होतं - 'काम आहे म्हणून जीवनात मजा आहे. काम संपलं की आयुष्य संपतं. म्हणून कधी रिटायर व्हायचं नाही. जी माणसं लवकर रिटायर होतात, ती लवकर जातातही. म्हणून मी सतत नवीन काम शोधत असते.'

आशाताई हे फक्त बोलत नाहीत, त्या हे जगतात. त्यांचा लावणीचा एक नवा कोरा कार्यक्रम येऊ घातलाय. त्यांच्याकडे खूप सुंदर अशा लावण्या आहेत. आशाताईंनी जसे हिंदी चित्रपट गीतांचे, भावगीतांचे कार्यक्रम केले, त्याचप्रमाणे हा लावण्यांचा कार्यक्रम घेऊन त्या येत आहेत. आशाताई फक्त गातील. मागे लावणीचा वाद्यवृंद असेल. तुणतुण्यापासून ते ढोलकीपर्यंत सारं काही... पहिला प्रयोग ऑक्टोबरमध्ये पुण्यात होईल.

ऑक्टोबरमध्येच संगीतकार श्रीधर फडके यांच्यासोबत नवा अल्बम येत असल्याची आनंदवार्ताही त्या देतात. श्रीधर फडके म्हणाले की, ज्यांचा आवाज स्वरेल असतो, त्यांच्या गळ्यात गंधाराचा वास असतो असं मानतात. आपला तानपुरा परफेक्ट सुरात लागला, की त्याच्या खर्जातून गंधार ऐकू येतो, तसंच आशाबाईंचं गाणं आहे. म्हणूनच शांताबाईंकडून एक गाणं मी लिहवून घेतलं खास आशाताईंसाठी. 'साकार गंधार हा ही मूर्त मंदार हा' असे या गाण्याचे शब्द आहेत. याशिवाय गदिमांनी लिहिलेल्या एका कवितेचा कागद घरी सापडला. त्यात एक कविता अर्धी होती - 'दिवसाढवळ्या प्राण सखा, मला म्हणाला येशील का...' हे गाणं पुढे शांताबाईंनीच पूर्ण केलं. ग्रेसांचं 'मंदिरे सुनी सुनी' ही कविताही चालबद्ध झाली. इंदिरा संत, अरुणा ढेरे, संदीप खरे या साऱ्यांच्या कविता या अल्बममध्ये आहेत. ही आठही गाणी आशाबाई गाणारेत. चाली फ्रेश आहेत. ध्रुपदातल्या नोमतोमचाही वापर केलाय मी. खूप वर्षांनी मी आणि आशाबाई एकत्र काम करतोय.

मी अजूनही तरुण आहे, असे म्हणणाऱ्या आशाताईंचं आजच्या युथशी अगदी घट्ट नातं आहे. त्यांची आजच्या पिढीविषयी काहीही तक्रार नाही. ही पिढी साफ आहे. या पिढीचा दृष्टिकोन निकोप असतो, असं त्यांना वाटतं. त्यांनी आयआयटीतला एक किस्सा सांगितला. आयआयटीत त्यांचा लाइव्ह कार्यक्रम ठेवला तेव्हा त्यांना खूप धास्ती वाटत होती... ही आजची पोरं आपली गाणी काय ऐकणार, असं त्यांना वाटत होतं. स्टेजवर जाताच त्यांनी त्या कॅम्पसमधल्या मुलांना विचारून टाकलं की, माझं गाणं आवडेल ना? त्यावर मुलांनी टाळ्या-शिट्ट्या वाजवत त्यांना पावती दिली. मग 'दो लफ्जो की हैं'पासून सुरुवात होताच कॅम्पसही त्या सुरांमध्ये हरवून गेला, भरभरून दाद देऊ लागला, त्यांच्यासोबत गाऊ लागला.. हीच त्यांची तारुण्याची व्याख्या आहे.



**आशाताईंचं गाणं आजही तितकंच उत्साही आहे. त्यांचा रियाज आजही सुरूये तितक्याच आत्मीयतेने... सुरांनी मांडी घालून त्यांच्यापाशी बसून त्यांचं गाणं ऐकत राहावं इतकी सेवा त्यांनी आजवर केलीये. सुरांपासून त्यांचं जगणं वेगळं नव्हेच. कॅन्व्हासवरचे रंग सरावलेल्या हातातून अलगद निसटत अधिक बोलके व्हावेत, तसं आशाताईंचं गाणं त्यांच्या प्रत्येक चाहत्याच्या आयुष्यातले रंग रेखाटत अधिकाधिक नितळ होतंय... अविचल होतंय... अवीट होतंय...!**




दीड वर्षामध्ये दीड हजार बांगलादेशी गजाआड, पाचशे हद्दपार

# दीडशे रुपयांत घुसखोरांना एन्ट्री

**जयेश शिरसाट** | दि. २५ (मुंबई)

**आम्हाला** पुण्याला जायला २५० रुपये लागतात; मात्र एका बांगलादेशी घुसखोराला यापेक्षा जवळपास निम्म्या पैशांत म्हणजे केवळ दीडशे रुपयांत भारतात एन्ट्री मिळते. हजार-दीड हजाराचे पॅकेज दिले, की त्याला बांगलादेशातून उचलून मुंबईत सेट करेपर्यंत सारेच काम केले जाते. घुसखोरांवर कारवाई करणाऱ्या विशेष

SUNDAY स्पेशल

शाखेच्या हाती ही धक्कादायक माहिती आली आहे.

गेल्या दीड वर्षामध्ये शहरात भारतीय म्हणून स्थायिक होऊ पाहणाऱ्या दीड हजार बांगलादेशी घुसखोरांना विशेष शाखेने अटक केली. त्यापैकी सुमारे पाचशे घुसखोरांना मायदेशी पोचविण्यात आले. मात्र अधिकारी मुंबईत पोहोचण्याआधी हे घुसखोर परतलेले असतात !

बांगलादेशींना भारतात घुसविण्यासाठी एजंटांच्या टोळ्या बीएसएफ आणि बांगलादेश रायफल्स जवानांशी संधान साधून आहेत. मुंबईतून बांगलादेश आणि पुन्हा मुंबईत आणून सोडण्यासाठी अवघे दीड ते दोन हजार रुपये आकारले जातात. त्यात तो एजंट रेल्वेचे तिकीटही काढतो. विनारोकटोक सीमापार नेतो आणि पुन्हा भारतात आणून सोडतोही.



**अशी होते अटक...**

साहेब, हा घुसखोर आहे. त्याच्याकडे भारतीय असल्याची कोणतीही कागदपत्रे नाहीत, अशी माहिती खबऱ्यांनी आणली, की मुंबई पोलिसांच्या विशेष शाखेतली आय ब्रॅन्च कामाला लागते. त्यात तथ्य आढळल्यास घुसखोरांना चौकशीसाठी ताब्यत घेतले जाते. जन्मदाखला, रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र अशी बहुतांश कागदपत्रे घुसखोरांकडे नसतात. मग त्यांना लागलीच इंडियन

**बांगलादेशींवरील कारवाई**

| वर्ष | गुन्हे | अटक | हद्दपार |
|---|---|---|---|
| २०११ | १५१ | ११३४ | २१८ |
| २०१२ | ६३ | ४२३ | २२७ |

दरवर्षी सरासरी दोन हजार बांगलादेशी घुसखोरांना मायदेशी धाडले जाते. घुसखोरांच्या मनात अटकेची भीती जिवंत राहावी, यासाठी जास्तीत जास्त बांगलादेशींना शोधून त्यांना मायदेशी धाडण्यावर आमचा भर आहे.
**- नवल बजाज,**
अप्पर आयुक्त, विशेष शाखा

५० लाख घुसखोर /२

